दै. देशोन्नती दि. 09/07/2024

# दोन विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून चोरीचे पाच गुन्हे उघड

## ■ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ८ जुलै रोजी केलेल्या कारवाईत दोन विधिसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिलेल्या आदेशानुसार स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय यांनी स्थापन केलेल्या पथकातील सपोनि संतोष शेकडे व पोउपनि साईनाथ पुयड यांना ८ जुलै रोजी मिळालेल्या माहितीनुसार दोन संशयीत विधीसंघर्षग्रस्त बालकांची त्यांच्या नातेवाईकासमक्ष विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी शहरातील दोन मंदीर चोरी व तिन मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या नातेवाईकांच्या ताब्यातुन त्यांनी चोरी केलेल्या दोन मोटारसायकली, तिन मोबाईल व गुन्हे करतांना वापरलेली लोखंडी टॉमी असा एकूण १ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून त्यांना पुढील कारवाईसाठी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाई पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय, सपोनि संतोष शेकडे, पोउपनि साईनाथ पुयड, पोलीस अंमलदार गंगाधर कदम, बालाजी तेलंग, रुपेश दासरवार, किशन मुळे, बंडु कलंदर, गणेश धुमाळ, विलास कदम, अनिल बिरादार, साहेबराव कदम, गजानन बयनवाड, महीला पोलीस अंमलदार किरण बाबर, चालक शंकर केंद्रे यांचा समावेश होता.

दै. प्रजावाणी.

# दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून चोरीचे पाच गुन्हे उघड

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नांदेड, दि. ८ : येथील स्थानिक गुन्हे शाखेच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत दोन विधी संघर्षग्रस्त बालकांकडून चोरीचे पाच गुन्हे उघड झाले आहेत. या कारवाईत पोलिसांनी दोन मोटारसायकली, तीन मोबाईल, गुन्हे करताना वापरलेली लोखंडी टॉमी असा एकूण १ लाख ६६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हेगारांचा शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेकडे, पोउपनि साईनाथ पुयड यांच्या पथकाने नांदेड जिल्ह्यात चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेतला. यामध्ये दोन विधी संघर्षग्रस्त बालकांकडून चोरीचे पाच गुन्हे केल्याचे उघड झाले आहे. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली आहे.

संबंधित दोन विधी संघर्षग्रस्त बालकांकडून विमानतळ, शिवाजीनगर, भाग्यनगर आदी पोलीस स्थानकाअंतर्गत गुन्हे केले आहेत. पोलिसांनी या बालकांचा त्यांच्या नातेवाईकांसमक्ष विचारपूस केली असता बालकांनी चोरी केल्याचे पंचासमक्ष कबुली दिली आहे. चोरीतील १ लाख ६६ हजार रूपयांचा ऐवज भाग्यनगर पोलीस स्थानकात जमा करण्यात आला आहे.